नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक :– २०/४/२०१०

**–: परिपत्र :–**

**पुणे महानगरपालिका मुख्य सभेच्या कामकाजाच्या नियमापैकी नियम क्रं. १ (के) अन्वये सोमवार दि. १९/४/२०१० रोजी दुपारी ४:०० (चार) वाजता भरलेल्या माहे एप्रिल २०१० या मासिक सभेच्या कार्यपत्रिकेवर तातडीचे म्हणून दाखल करुन घेण्यात आलेले विषय.**

**विषय क्रं. १/५९**

संदर्भ :–
१) मा.स्थायी समिती ठराव क्र. १४३९ दि. १९/१/२०१०
२) मा.मुख्य सभा ठराव क्र. ४१६ दि. २७/१/२०१०
३) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/वानि/१००४ दि. १९/३/२०१० चे पत्र.
४) मा.सौ.मेधा कुलकर्णी, मा.गणेश बिडकर, मा.विजय देशमुख, मा.अशोक हरणावळ यांची दि. ३०/३/२०१० ची उपसूचना
५) स्थायी समिती ठराव क्र. १८७२ दि. ३०/३/२०१०
६) मा.गणेश बिडकर, मा.सौ.मेधा कुलकर्णी व मा.विजय देशमुख यांचे दि. ३१/३/२०१० चे फेरविचाराचे पत्र.
७) मा.निलेश निकम, सभागृह नेता, मा.गणेश बिडकर, मा.सौ.मेधा कुलकर्णी, मा.विजय देशमुख व मा.अशोक हरणावळ यांची दि. ६/४/२०१० ची उपसूचना.
८) स्थायी समिती ठराव क्र. ४, दि. ६/४/२०१०.

–––

स्थायी समिती ठराव क्र. १८७२ दि. ३०/३/२०१० चा फेरविचार करण्यात आला.

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

पुणे महानगरपालिका हद्दीत वनाझ ते रामवाडी दरम्यान मेट्रो प्रकल्प टप्प्याची अंमलबजावणी करणेबाबत खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) यापुर्वी मा.मुख्य सभा ठराव क्र. ४१६ दि. २७/१/२०१० अन्वये मान्य मेट्रो प्रकल्पातील एका टप्प्याची म्हणजेच पुणे महानगरपालिका हद्दीतील वनाझ ते रामवाडी दरम्यान मेट्रो रेल्वे प्रकल्पाची अंमलबजावणी सुरु करणेस

२) वनाझ ते रामवाडी या दरम्यान असलेला मेट्रो मार्ग हा जमिनीची उपलब्धता, आर्थिक गुंतवणूक पर्याय व प्रवाशांची संख्या इ.बाबींचा विचार करुन आवश्यतेनुसार विमानतळापर्यंत व नगर रसत्यापर्यंत खराडी/चंदननगर पर्यंत वाढवून त्याची अंमलबजावणी करणेस

३) यापुर्वी मा.मुख्य सभा ठराव क्र. ४१६ दि. २७/१/२०१० अन्वये मान्य केल्यानुसार ५% तरतुदीऐवजी पुणे महानगरपालिका क्षेत्रात करण्यात येणाऱ्या वनाझ ते रामवाडी दरम्यानच्या मेट्रो रेल्वे मार्गाकरिता १०% इतकी तरतुद अंदाजपत्रकीय तरतुदीमधून करणेस

४) पुणे मेट्रो रेल प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी आणि समन्वयासाठी विशेष कार्याधिकारी (मेट्रो रेल्वे) नेमणूक तात्पुरत्या कालावधीसाठी करणेस आणि या पदाकरिता शैक्षणिक अर्हता, अनुभव, वेतन, अटी व शर्ती निश्चित करणेस व नेमणूक करणेचे आणि करारनामा करण्याचे अधिकार महापालिका आयुक्त यांना देण्यास

५) सदर प्रकल्पाचा पाठपुरावा करणे व तत्सम बाबीचे अधिकार महापालिका आयुक्त यांना देणेस

६) वनाझ ते रामवाडी दरम्यानच्या नियोजित मेट्रो प्रकल्पात बाधित जागांचे ताबे, बाधित इमारती, रस्त्यावर

बांधण्यात येणाऱ्या पिलर्समुळे होणारी वाहतुक कोंडी, मेट्रो स्टेशनसाठी लागणारी पार्किंगची सोय इत्यादी सर्व बाबींचा विचार करुन मेट्रोची अंमलबजावणी करण्यास व सदर प्रकल्पासाठी पुणे शहराचा स्वतंत्र एस.पी.व्ही.स्थापन करुन मेट्रो प्रकल्प राबविणेस.

याबाबत यापुर्वी झालेला स्थायी समिती ठराव क्र. १८७२ दि. ३०/३/२०१०चा वरीलप्रमाणे दुरुस्त करण्यात येत आहे.

**विषय क्रं. २/६०**

संदर्भ :- १) मा.शंकरराव बेलदरेपाटील व मा.सौ.रजनी त्रिभुवन यांचे दि. १०/७/२००९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र. ३९९ दि. २८/७/२००९.
३) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी क्र.मआ/उआ विका क्र.४/१०२९ दि.२९/३/२०१० ने पाठविलेला अभिप्राय
४) स्थायी समिती ठराव क्र. १२, दि. ६/४/२०१०.

---

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन -

वॉर्ड क्र.१४४ दत्तनगर संतोषनगर विविध ठिकाणी भुमिगत केबल टाकून वाहतुकीस अडथळा ठरणारे खांब हटवणेसाठी. र.रु.१० लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९-१० चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १३४, अ.क्र.३, शहरातील विविध रस्त्यांवर फुटपाथ करणे, पेव्हींग ब्लॉक बसविणे व साईडपट्टया करणे, (यादी क्र.एस- १), पान क्र.२२६, अ.क्र.१४४, वॉर्ड क्र.१४४ नवग्रह शनी मंदिर परिसर संतोषनगर गवळीवाडा परिसर येथे विविध ठिकाणी कॉक्रीटकरुन इंटरलॉकिंग ब्लॉक बसविणे. | १० लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| वॉर्ड क्र.१४४ दत्तनगर संतोषनगर विविध ठिकाणी भुमिगत केबल टाकून वाहतुकीस अडथळा ठरणारे खांब हटवणे | --- | १० लाख |

**विषय क्रं. ३/६१**

संदर्भ :- १) शासन निर्णय,वित्त विभाग मंत्रालय, मुंबई ३२ दि. २२/४/२००९ ची अधिसूचना.
२) महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्रमांक सवेआ/१००८ (५२१/०८) मा.शि-२ मंत्रालय मुंबई ३२, दि. १२/६/२००९.
३) महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. व्ही.ओ.सी.२००९/७५/०९ व्यशि -४ मंत्रालय मुंबई ३२, दि. २७/८/२००९.
४) महाराष्ट्र शासन वित्त विभवक्ष शासन निर्णय क्रमांक सेनिवे १००९/प्र.क्र.३३ सेवा ४ मंत्रालय मुंबई ३२, दि. २२/६/२००९.
५) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक सेनिवे १००९/प्र.क्र.२९/सेवा ४ मंत्रालय मुंबई , दि. ५/५/२००९.
६) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.म.आ./माध्य व तांत्रिक/१००५, दि.२२/३/२०१० चे पत्र.
७) महिला व बाल कल्याण समिती ठराव क्र. ८६ दि. २५/३/२०१०.
८) स्थायी समिती ठराव क्र. २५, दि. ६/४/२०१०.

---

मा.महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे महानगरपालिका संचालित सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक व तंत्र शाळा शासन मान्य व अनुदानित आहे. संदर्भ क्र. १,२ व ३ नुसार या शाळांकडील शिक्षकांना शासन आदेशानुसार सुधारित सहावे वेतन आयोग दि. १/१/२००६ पासून लागू करावयाचा आहे. यासर्व वेतनावर शासनाकडून १०० टक्के अनुदान मिळत आहे.

दि. १/१/२००६ पासून माध्यमिक, उच्च माध्यमिक व तंत्र शाळांकडील सर्व शिक्षक व सेवानिवृत्त आणि कुंटुंब वेतनधारक शिक्षकांना सुधारित सहावे वेतन आयोग शासन निर्णयात नमुद असलेल्या पद व वेतन श्रेणीप्रमाणे लागू करावयाचा आहे.

संदर्भ क्र. १,२ व ३ नुसार कार्यरत असलेल्या शिक्षकांचा दि. १/१/२००६ ते ३१/३/२००९ अखेर पर्यंतचा वेतन आयोगाचा फरक पुढील ५ वर्षात समान हप्त्यात भविष्य निर्वाह निधीमध्ये जमा करावयाचा आहे. त्यांना दिलेल्या अग्रीमाची रक्कम पहिल्या हप्त्यातून समायोजित करून उर्वरित रक्कम भ.नि.निधीमध्ये जमा करावी लागणार आहे.

संदर्भ क्र. ४ व ५ नुसार सेवा निवृत्त शिक्षक व कुंटुंब वेतनधारक यांचा दि. १/१/२००६ ते ३१/३/२००९ अखेर पर्यतच्या वेतन आयोग फरकांची रक्कम देताना त्यांना देण्यात आलेली अग्रीमाची रक्कम पहिल्या हप्त्यातून समायोजित करून उर्वरित रक्कम पुढील ५ वर्षात समान हप्त्यात रोखीने अदा करावी लागणार आहे.

सध्या कार्यरत असलेले शिक्षक व सेवानिवृत्त आणि कुंटुंब वेतन धारक यांना दि. १/४/२००९ पासून वेतन आयोगाचा फरक रोख अदा करावा लागणार आहे.

तरी खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) मनपा संचालित माध्यमिक, उच्च माध्यमिक व तंत्र शाळांकडील सर्व कार्यरत सेवा निवृत्त आणि कुंटुंब वेतनधारक शिक्षकांना सुधारित सहावा वेतन आयोग शासन निर्णयातील वेतनश्रेणी प्रमाणे दि. १/१/०६ पासून लागू करणेस.

२) संबंधित सर्व कार्यरत शिक्षकांना दि. १/१/२००६ ते ३१/३/२००९ अखेर पर्यतचा वेतन आयोगाचा फरक अग्रीमाची रक्कम, प्रथम हप्त्यातून समायोजित करून उर्वरित रक्कमच पुढील ५ वर्षात समान हप्त्यात भविष्य निर्वाह निधीमध्ये जमा करणेस.

३) सेवा निवृत्त व कुंटुंब वेतनधारक शिक्षकांच्या दि. १/१/२००६ ते ३१/३/२००९ अखेर पर्यंतचा वेतन आयोगाचा फरक अग्रीमाची रक्कम पहिल्या हप्त्यातून समायोजित करून उर्वरित रक्कम पुढील ५ वर्षात समान हप्त्यात रोखीने अदा करणे व निवृत्त वेतनाचा / कुंटुंब निवृत्ती वेतनाचा प्रत्यक्ष लाभ दि.१/४/०९ पासून अदा करणेस.

४) सध्या कार्यरत शिक्षक सेवा निवृत्त आणि कुंटुंब वेतन धारक यांना दि. १/४/०९ पासूनचा वेतन आयोगाचा फरक रोख अदा करणेस

<u>विषय क्रं. ४/६२</u>

संदर्भ :– १) डायरेक्टर दि डेक्कन पेपर मिल्स कंपनी लि.मुंढवा तर्फे ॲड्.श्री सतिश खताळ पाटील यांची दि.२४/२/२०१० ची या कार्यालयकडील आ.क्रं.३७३८,दिनांक ०६/३/२०१० ने प्राप्त नोटीस.

२) मा.स्थायी समिती ठराव क्रमांक २७९,दि.२४/५/२००५

३) मा. जिल्हाधिकारी भूसंपादन शाखा, पुणे यांचेकडे जा. क्रं. एलअेक्यू/०/११७१ दि.१७/८/२००५ ने पाठविलेला प्रस्ताव.

४) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/नअ/१४ दि. ८/४/२०१० चे पत्र.

५) स्थायी समिती ठराव क्र. ५३, दि. १३/४/२०१०.

---

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

एम.आर.टी.पी.ॲक्ट १९६६ चे कलम १२७ अन्वये नोटीस मुंढवा स.नं. ९४(क) या मिळकतीसह मा.स्थायी समिती ठराव क्र. २७९ दि. २४/५/२००५ नुसार चालू असलेल्या मुंढवा घोरपडी दरम्यानच्या २४ मी.डी.पी.रस्त्यात बाधित स.नं. ९४क सह इतर सर्व मिळकतीची भूसंपादनाची कार्यवाही भूसंपादन कायद्यान्वये अथवा एम.आर.टी.पी.ॲक्टचे कलम १२६ अन्वये तडजोडीने पुर्ण करणेस मान्यता द्यावी अशी मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**<u>विषय क्रं. ५/६३</u>**

संदर्भ :– १) मा.ॲड्.किशोर शिंदे व मा.बाबु वागसकर यांचे दि. १२/४/२०१० चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ५४, दि. १३/४/२०१०.

–––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

महाराष्ट्र राज्याला ५० वर्षे पुर्ण होत असल्याने सन २०१० हे वर्ष सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करीत आहे. हा सुवर्ण महोत्सव साजरा करण्यासाठी पुणेकर नागरिकांना महाराष्ट्राच्या कलेची ओळख व्हावी यासाठी एका सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन पुणे मनपाच्या वतीने करण्यास तसेच या महोत्सवासाठी अंदाजे र.रुपये पंचवीस लाख खर्च करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**